## बिनतारी संदेश

**प्रति** :- सर्व ठाणेदार/ सर्व उपविभागीय पोलीस अधीकारी चंद्रपूर जिल्हा.
प्रभारी अधीकार, पोलीस मुख्यालय चंद्रपूर, दंगा नियंत्रण पथक, पोलीस कल्याण विभाग, स्था.गु.शा., जिविशा, वाहतुक शाखा चंद्रपूर, मो.प.विभाग, नियंत्रण कक्ष चंद्रपूर, नागरी सुविधा केद्र, सायब्रर सेल, सुरक्षा शाखा, दविअ, नक्षल सेल, नविअ बिडिडिएस, आर्थिक गुन्हे शाखा, दलद प्रतिसाद पथक, अर्ज तक्रार शाखा, महिला सहय्य कक्ष, श्वान पथक चंद्रपूर, श्वान पथक राजुरा, फिंगर प्रिंट कार्या., वाचक शाखा पो.अ.चंद्रपूर, वाचक शाखा अ.पो.अ.चंद्रपूर, सि.सि.टि.एन.एस, नाहसं चंद्रपूर, मसुप चंद्रपूर, दहशतवाद पथक चंद्रपूर

**पासुन** :- पोलीस अधीक्षक, चंद्रपूर

................................................................................................................................

क्रमांक पोअच/एस बी-१/अ.रजा-मंजुर/ २०२१ चंद्रपूर दिनांक ०६/०४/२०२१

................................................................................................................................

चंद्रपूर जिल्हा पोलीस. दलाचे आस्थापनेवरील नेमणुकीस असलेले सफौ ते पोलीस शिपाई **(निलंबित कर्मचारी वगळुन)** यांना सन २०२१-२०२२ या वित्तीय वर्षाकरीता खालील अटीचे अधीन राहुन ३० दिवस अर्जित रजा मंजुरी देण्यात येत आहे. (रजा मंजुर करण्यास या कार्यालयास वेगळा अर्ज सादर करण्याची आवश्यकत राहणार नाही.)

१) प्रभारी अधिकारी यांनी आपले पोस्टे/ उपपोस्टे / पोलीस चौकी, येथील कर्मचारी यांचे कडुन अर्जित रजेचे अर्ज घेवुन त्यांच्या जेष्टतेप्रमाणे व आवश्यकत प्रमाणे कॅलेंडर तयार करुन मंजुर असलेल्या ३० दिवस अर्जित रजेवर पोलीस अंमलदार यांचे आवश्यकते नुसार सोडण्यात यावे(.)

२) १५ दिवस अर्जित रजेचे रोखीकरण करण्यासाठी अमंलदार इच्छुक असल्यास प्रभारी अधिकारी यांनी अमंलदार यांचे कडून अर्ज प्राप्त करून अर्जाची यादी तयार करुन ते अर्ज आपले अभिप्रायासह कार्यालयास सादर करावे(.)

३) अमंलदार यांचे रजा लेखा खाती अर्जित रजा शिल्लक असल्यास १५ दिवस अर्जित रजेचे रोखीकरण मंजूर करण्यात येईल रजा शिल्लक नसल्यास रोखीकरण होणार नाही व तसे कर्मचा-यास कळविण्यात येईल(.)

४) अमंलदार यांना अर्जित रजा न उपभोगता रोखीकरण करावयाचे असल्यास रजा न उपभोगता १५ दिवस अर्जित रजेचे रोखीकरण करण्याबाबत अर्ज प्रभारी अधिकारी यांनी प्राप्त करुन यादी तयार करुन आपले अभिप्रायासह यादी या कार्यालयास मंजुरीस सादर करावी(.)

५) आपले पो.स्टे.ला अर्जित रजा तसेच रोखीकरणा बाबत प्राप्त झालेल्या अर्जाची नोंद रजिस्टरला अद्यावत करण्यात यावी. जेणे करुन कोणत्याही कर्मचारी यांचे दोनदा रजा रोखीकरण्याचे अर्ज प्राप्त होणार नाही या बाबत प्रभारी अधिकारी यांनी दक्षता घ्यावी (.)

**टिप** :- बक्कल नंबर -४५१, ५३४, ६००, ७३६, ८०५, ८५१, २०५७ यांना सन २०२१-२२ या वित्तीय वर्षाची ३० दिवस अर्जित रजा मंजूर असल्याने त्यांना वगळण्यात येत आहे (.)

................................................................................................................................

(अरविंद साळवे)
पोलीस अधीक्षक, चंद्रपूर